पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट क्रमांक - ७२० दिनांक - २४/०९/२०२३

मुंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

### नागरिकांची सुरक्षितता व पोलीसांचे आरोग्य या करीता अगळावेगळा पर्यावरण पुरक उपक्रम.

दि. २३/०९/२०२३ रोजी मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर येथे नागरिकांची सुरक्षितता व पोलीसांचे आरोग्य या करीता मुंढवा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.विष्णू ताम्हाणे यांचे संकल्पनेतून मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर व मा. पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. अपर पोलीस आयुक्त, रंजनकुमार शर्मा, पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे मा. पोलीस उप आयुक्त, विक्रांत देशमुख, मा. सहा. पोलीस आयुक्त, श्रीमती अश्विनी राख, हडपसर विभाग, पुणे शहर, स्थानिक उद्योजक व नगरसेवक श्री. उमेश गायकवाड व इतर नागरिक तसेच लोणी काळभोर, हडपसर, वानवडी पोलीस ठाणेंचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंढवा पोलीस ठाणेस असे असे उपस्थित असून सदरचा कार्यक्रम मुंढवा पोलीस ठाणेस आयोजीत करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुंढवा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.विष्णु ताम्हाणे यांनी केले. त्यावेळी त्यांनी आपल्या प्रास्ताविकमध्ये मा. पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी पोलीस स्टाफचे शारिरीक तंदुरूस्तीकडे व गुन्ह्यांना प्रतिबंध करून नागरीकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे बाबत सुचना दिल्या होत्या. यांनी दिलेल्या सुचनातुन आम्हाला पोलीस ठाणे हद्दीत सायकल पेट्रोलींग करणे बाबतची संकल्पना सुचली. त्यांनी सायकल पेट्रोलिंगची कल्पना पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार यांना सांगितली व चर्चा करून सायकल पेट्रोलिंगबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळाला. प्रास्ताविकनंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. अपर पोलीस आयुक्त, श्री.रंजनकुमार शर्मा यांचे हस्ते सायकल पेट्रोलिंग शुभारंभ उद्घाटन कार्यक्रम पार पडला आहे. सदर कार्यक्रम आयोजन मुंढवा पोलीस ठाणेकडील पोलीस अंमलदार निलेश पालवे, स्वप्निल शिवरकर, तानाजी देशमुख व इतर पोलीस ठाणे स्टाफ करवी करण्यात आले होते.

पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक ठिकाणी अरूंद रस्ते, गल्लीबोळाचे रस्ते असतात. त्यामुळे गस्त घालताना पोलिसांच्या वाहनांना मर्यादा येतात. या पार्श्वभूमीवर सायकलवरून गस्त घालणे सोपे होणार आहे. गस्तीच्या निमित्ताने प्रत्येक पोलिसाकडून काही अंतर सायकल चालविली जाणार आहे. परिणामी पोलिसाचे आरोग्य चांगले राहण्यास देखील मदत होणार आहे.

शहरातील मुंढवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अरुंद रस्ते, वाहतूक कोंडीचे अनुषंगाने पोलीस ठाणे हद्दीत गल्ली बोळात सायकल गस्त (पेट्रोलिंग) घालणार आहेत. यामुळे पोलिसांच्या शारिरीक तंदरूस्तीबरोबरच नागरिकांसोबत अधिकाधिक संपर्क आल्यामुळे त्यांच्यात सुरक्षेची भावना वाढण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. तसेच सायकल पेट्रोलींग हे पर्यावरण पुरक असल्याने वाहनांमुळे होणारे प्रदूषण टाळले जाईल. या उपक्रमाकडे नागरिकांनी देखील कुतूहलाने पाहून नागरिक देखील सायकलिंग करणे करीता पेरित होतील.


पुणे शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत
मुंढवा पोलीस ठाणे येथे

